आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 13/05/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 124 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# मोदींचा अमृतकाळ,आता विषकाळ - राहुल गांधी

## नीट परीक्षा रद्द झाल्याने राहुल गांधी यांची केंद्र सरकारवर टीका !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणारी नीट परीक्षा रद्द झाल्याने देशभरातून पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व नाराजीचे वातावरण पाहायला मिळत आहे. विरोधकांकडून याप्रकरणी सरकारवर टीका होत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि खासदार राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर प्रहार करत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा तथाकथित अमृतकाळ आता विषात रुपांतर होऊ लागल्याची टीका केली आहे.**



राहुल गांधी यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याप्रकरणी पोस्ट करून सरकारवर हल्लाबोल केला. “नीट परीक्षा रद्द झाली, 22 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे परिश्रम, त्याग आणि स्वप्नं या भ्रष्ट भाजपा व्यवस्थेने चिरडून टाकली”, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. “लाखो विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा तोच मानसिक ताण, आर्थिक ओढाताण आणि अनिश्चिततेचा सामना करावा लागेल. दरवेळी पेपर माफिया निसटून जातात आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना शिक्षा भोगावी लागते”, असे राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. “कोणाच्या वडिलांनी कर्ज घेतले, कोणाच्या मातेने आपले दागिने विकले, लाखो मुलांनी रात्रीचा दिवस करून अभ्यास केला. पण,त्या बदल्यात त्यांना मिळाले ते फक्त पेपर फुटी, सरकारी निष्काळजीपणा आणि शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार. हे केवळ अपयश नसून तरुणांच्या भविष्याशी केलेला अपराध आहे”, असा शब्दात राहुल गांधी यांनी सरकारला धारेवर धरले.“विद्यार्थ्यांचे निशीब कष्टापेक्षा पैसा आणि वशिल्याने ठरवले जाणार असेल, तर शिक्षणाला काय अर्थ उरेल?”, असा सवाल देखील गांधी यांनी उपस्थित केला. पंतप्रधानांचा तथाकथित ‘अमृतकाळ’ देशासाठी ‘विषकाळ’ बनला आहे, असे गांधींनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. पेपरफुटीच्या आरोपानंतर केंद्राने नीट परीक्षा -2026 रद्द केली. 03 मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा अचानक रद्द करण्यात आल्याने विद्यार्थी आणि पालकांकडून तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त केली जात आहे. केंद्राने ही परीक्षा पुन्हा घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. परीक्षेची तारीख नंतर जाहीर करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणाचा सीबीआयच्या माध्यमातून तपास होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# महापालिकेचे पदाधिकारी आता सुरक्षेत!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महापौर, उपमहापौरांनंतर आता पिंपरी-चिंचवड महापालिका स्थायी समितीचे अध्यक्ष, सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेते देखील सुरक्षेत फिरणार आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को) यांच्याकडून दोन वर्षांसाठी नऊ सुरक्षा रक्षक घेतले जाणार आहेत. एका सुरक्षा रक्षकाला प्रतिमहिना 34 हजार 650 रुपये वेतन दिले जाणार असून, दोन वर्षांसाठी 74 लाख 84 हजार 400 रुपये खर्च येणार आहे.**




**स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेते, विरोधी पक्षनेत्यांनाही मिळणार सुरक्षा रक्षक**

पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर यांना यापूर्वीच सुरक्षा देण्यात आली असून, त्यांच्याबरोबर एक सुरक्षारक्षक असतो. त्याशिवाय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर आणि विक्रांत बगाडे यांनाही एका सुरक्षा देण्यात आला आहे. आता स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, सभागृह नेते प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनाही त्यांच्या मागणीनुसार सुरक्षा देण्यात येणार आहे.

दालनात नागरिकांची वर्दळ असते. विविध संघटना समस्या घेऊन येतात. त्यामुळे ही पदे महत्त्वाची असल्याचे सांगून सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी तिन्ही पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांकडे एक एप्रिल रोजी केली होती.या पार्श्वभूमीवर सुरक्षा विभागाने पुणे महापालिकेतील सुरक्षा अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तिथे या तिन्ही पदावरील व्यक्तींच्या मागणीनुसार सुरक्षा कर्मचारी पुरविण्यात येत असल्याचे तेथील अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेते यांना मागणीनुसार सुरक्षा पुरविण्यात येणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 13/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# यूके मधील अॅबरिस्टविथ विद्यापीठ आणि पीसीईटी शिष्टमंडळाची बैठक संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांनी एकत्र येऊन उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी योग्य समन्वय साधून मजबूत जागतिक परिवर्तनकारी शैक्षणिक भागीदारी निर्माण केली पाहिजे.**



यासाठी अॅबरिस्टविथ विद्यापीठ आणि भारतात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट सोबत एक दृढ नाते निर्माण करत आहे याचा पुढील काळात दोन्ही संस्थांच्या विस्तारासाठी उपयोग होईल असे मत यूके मधील अॅबरिस्टविथ विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय विभाग, सहयोगी प्र-कुलपती प्रा. नायजेल होल्ट यांनी व्यक्त केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या उपस्थितीत यूके मधील अॅबरिस्टविथ विद्यापीठ सोबत 2025 मध्ये सामंजस्य करार करण्यात आला होता. त्या कराराचा पुढचा टप्पा म्हणून पीसीईटी आणि यूके मधील अॅबरिस्टविथ विद्यापीठ शिष्टमंडळाची बैठक पीसीईटी ट्रस्टच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

यावेळी यूके मधील अॅबरिस्टविथ विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय विभाग, सहयोगी प्र-कुलपती प्रा. नायजेल होल्ट, प्रादेशिक व्यवस्थापक सामंथा वॅलिन, सल्लागार झफीर आलम आणि पीसीईटीच्या वतीने ओ. एस. डी. डॉ. योगेश भावसार, डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन, डॉ. निरुपमा कोचेरलाकोटा, डिजिटल मार्केटिंग विभागाच्या शुभांगी रामटेके यांनी या बैठकीत सहभाग घेतला.

# पिंपरी चिंचवड क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर ठरतेय - महापौर रवि लांडगे

## किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या खेळाडूंचा महापौर कार्यालयात गौरव

**पिंपरी - पिंपरी चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर बनत आहे. आपल्या शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आहेत, ही प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी बाब आहे. जयदेव म्हमाणे यांच्यासारख्या खेळाडूंमुळे शहरातील युवा पिढीला नवी ऊर्जा मिळत आहे. अशा खेळाडूंच्या पाठीशी महापालिका कायम ठामपणे उभी राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते. खेळाडूंना भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनदेखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी दिले.

उत्तर प्रदेशमधील सहारनपूर येथे नुकत्याच भारत-नेपाळ यांच्यात पार पडलेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून खेळताना थेरगाव येथील चार खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचा गौरव वाढविला. यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष यश संपादन केले. यापूर्वीही त्यांनी तब्बल 11 सुवर्णपदके जिंकून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाची दखल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील घेतली असून, हे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचे क्षण असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, 'खेळाडूंचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराचा सन्मान असतो. कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर पिंपरी चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. भविष्यात अशा खेळाडूंना अधिक प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे देखील त्यांनी सांगितले.

# प्रेमसंबंधाच्या संशयातून तरुणावर जीवघेणा हल्ला; भोसरीत चौघांविरोधात गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | युनूस खतीब

**भोसरीतील चक्रपाणी वसाहत परिसरात प्रेमसंबंधाच्या संशयातून एका तरुणावर चौघांनी मिळून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शिवीगाळ, दमदाटी करत दांडके आणि दगडाने मारहाण करण्यात आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी भोसरी पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. 10 मे 2026 रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास राम मंदिर हायस्कूलजवळ, रामनगर, चक्रपाणी वसाहत परिसरात घडली. फिर्यादी शुभम भगवान दुतोंडे (वय 22) हे त्यांच्या राहत्या घरासमोर बसलेले असताना आरोपींनी त्यांच्याशी वाद घालत अचानक हल्ला चढविला. आरोपी बंटी गायकवाड, सुमित शिंदे, पप्पू गायकवाड आणि आदित्य सावद यांनी फिर्यादीचे आरोपी क्रमांक 3 च्या बहिणीसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय घेत संतापाच्या भरात शिवीगाळ व दमदाटी सुरू केली. त्यानंतर चौघांनी मिळून फिर्यादीला हाताने, लाथाबुक्यांनी, दांडक्याने तसेच रस्त्यावर पडलेल्या दगडाने बेदम मारहाण केली.

या हल्ल्यात फिर्यादी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

या प्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 118(1), 352, 351(2), 3(5) तसेच भादंवि कलम 324, 504 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार ढेकणे करीत आहेत.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई : बुधवार पेठेत 5 बांग्लादेशी नागरिक ताब्यात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी : युनूस खतीब**

**पुणे पोलिसांनी शहरात अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या बांग्लादेशी नागरिकांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करत आणखी एक मोठी कारवाई केली आहे. झोन वन अंतर्गत बुधवार पेठ परिसरात राबविण्यात आलेल्या विशेष कॉम्बिंग ऑपरेशनमध्ये पाच बांग्लादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईमुळे शहरातील बेकायदेशीर वास्तव्य आणि त्यामागील स्थानिक नेटवर्क पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.**




विशेष म्हणजे, याच परिसरात दहा दिवसांपूर्वीही पुणे पोलिसांनी मोठी मोहीम राबवत 18 बांग्लादेशी नागरिकांवर कारवाई केली होती. त्यानंतर आता पुन्हा पाच जण सापडल्याने शहरात अशा नागरिकांचे जाळे अधिक व्यापक असल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

झोन वनचे डीसीपी कृषिकेश रावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, 1 जुलै 2025 पासून आतापर्यंतच्या अवघ्या 11 महिन्यांत पुणे पोलिसांनी तब्बल 94 बांग्लादेशी नागरिकांना पकडले आहे. यापैकी 60 हून अधिक जणांना आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या देशात डिपोर्ट करण्यात आले आहे.

प्राथमिक तपासात धक्कादायक बाबी समोर येत असून, पुण्यासह मुंबई, बंगळुरुसारख्या मोठ्या शहरांमध्ये बांग्लादेशी नागरिकांना स्थायिक होण्यासाठी स्थानिक एजंट आणि रॅकेट मदत करत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. बनावट कागदपत्रे, भाड्याने घरे मिळवून देणे, रोजगार उपलब्ध करून देणे यासारख्या माध्यमांतून हे नेटवर्क कार्यरत असल्याची माहिती समोर येत आहे.

या संपूर्ण रॅकेटचा तपास सध्या पुणे पोलीस अधिक सखोलपणे करत असून, संबंधित दलाल आणि स्थानिक संपर्कांची माहिती गोळा केली जात आहे.

शहरातील संवेदनशील भागांमध्ये पुढील काही दिवसांत आणखी कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात येणार असल्याचेही पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन करताना परिसरात संशयास्पद हालचाली, बनावट कागदपत्रांचा वापर किंवा ओळख लपवून राहणाऱ्या व्यक्तींबाबत तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 13/05/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर बैठक

## एका महिन्यात अंमलबजावणी अहवाल सादर करा : विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**मुंबईतील गोरेगाव येथील चित्रनगरीसह राज्यातील चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार आणि ज्युनिअर कलाकारांच्या विविध प्रश्नांबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. कंत्राटी फिल्म कामगार आणि ज्युनियर कलाकारांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संयुक्त समितीची बैठक घेण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच, करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सविस्तर अंमलबजावणी अहवाल एका महिन्याच्या आत सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.**




हिवाळी अधिवेशन 2025 दरम्यान 9 डिसेंबर 2025 रोजी आमदार सुनील प्रभू यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार व ज्युनिअर कलाकारांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत कामाचे निश्चित तास, सकस भोजनाची व्यवस्था, वेतन थेट निर्मात्यांकडून देणे, चित्रीकरण स्थळी स्वच्छता राखणे, महिला कलाकारांसाठी कपडे बदलण्याची स्वतंत्र सुविधा तसेच रात्रीच्या चित्रीकरणानंतर सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाच्या 14 फेब्रुवारी 2024 रोजी जारी करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणालीची (एसओपी) प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबतही बैठकीत निर्देश देण्यात आले. चित्रनगरी प्रशासनाने संबंधित निर्मिती संस्थांना यापूर्वी सूचना देऊनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याबाबत यावेळी चिंता व्यक्त करण्यात आली.

राज्यातील सुमारे 5 लाख कंत्राटी फिल्म कामगार व ज्युनिअर कलाकारांच्या हितासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

बैठकीस आमदार सुनील प्रभू, फिल्म सिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, फिल्मसिटीचे व्यवस्थापकीय सहसंचालक प्रशांत साजणीकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे उप व्यवस्थापक महेश वाव्हळ, कामगार विभागाचे सह आयुक्त संकेत कानडे तसेच विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# लंडनमधील मराठी बांधवांना मिळणार हक्काची जागा- आमदार शंकर जगताप

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : युनायटेड किंगडम (यूके) मधील मराठी बांधवांचे हक्काचे आणि प्रमुख सांस्कृतिक केंद्र असलेल्या 'महाराष्ट्र मंडळ, लंडन' या संस्थेच्या वास्तूची जागा "फ्री होल्ड" करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 5 कोटी रुपयांचा निधी परकीय चलनाद्वारे वितरित केला आहे. मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यामुळे मोठे यश आले आहे असे चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.**



या संदर्भातील अधिकृत माहिती राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पत्राद्वारे आमदार शंकर जगताप यांना दिली आहे.

आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले, लंडनमध्ये वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रीयन नागरिकांच्या सोयीसाठी आणि तेथील मराठी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र मंडळाच्या प्रांगणाची मालकी हक्काची जागा खरेदी करणे अत्यंत आवश्यक होते.

यासाठी संस्थेला आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी लेखी विनंती डिसेंबर 2024 मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.

मराठी भाषेचा परदेशात प्रसार व संवर्धन करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने या मागणीची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त असलेल्या 'राज्य मराठी विकास संस्थे'मार्फत 25 मार्च 2026 रोजी तब्बल 5 कोटी रुपयांचा निधी परकीय चलनाद्वारे थेट लंडन महाराष्ट्र मंडळाला वितरित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून लंडनमध्ये मराठी सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मराठी भाषेचे वर्ग चालवले जातात. आता हक्काची जागा मिळाल्यामुळे तिथे मराठी संस्कृतीचे संवर्धन अधिक जोमाने करता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

परदेशातील मराठी बांधवांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून आमदार शंकर जगताप यांनी केलेल्या यशस्वी पाठपुराव्याचे पिंपरी-चिंचवड आणि लंडनमधील मराठी वर्तुळातून कौतुक होत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 13/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper




बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968